# स्वराज कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्यूटर स्टडीज

स.नं.३, तळजाई पठार बस स्टॉप जवळ, धनकवडी, पुणे — ४११ ०४३

फोन नं:- ०२०-२४३६०३३३, इमेल आयडी :- swarajcollege@gmail.com वेब साईट :- www.swarajcollege.in


## शिष्यवृत्तीसाठी महत्वाची सूचना

संदर्भ क्र.२०२०-२१/९८०

दिनांक :- ११/०६/२०२१

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये शिष्यवृत्ती घेणा-या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, https://mahadbtmahait.gov.in हे संकेतस्थळ विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी पुन्हा सुरु झाले असून, शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी **ही शेवटचीच संधी देण्यात आलेली आहे. यापुढे मुदत वाढ मिळणार नाही,** तरीही सर्व SC, ST, OBC, NT, SBC, या प्रवर्गातील विद्यार्थ्यानी शिष्यवृत्तीचा अर्ज लवकरात लवकर भरून दिनांक ३० जून,२०२१ पर्यंत महाविद्यालयाच्या कार्यालयात जमा करावा.

पात्र विद्यार्थ्यानी शिष्यवृत्तीचा अर्ज वेळेत जमा न केल्यास अथवा संबंधित प्रमाणपत्रांची पूर्तता वेळेत न केल्यास त्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही. यासाठी सर्वस्वी संबंधित विद्यार्थीच जबाबदार असेल. तरी संबंधित विद्यार्थ्यास **महाविद्यालयाची संपूर्ण फी खुल्या प्रवर्गाप्रमाणे भरावी लागेल.** याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

11/6/2021.

प्रा. पवार अलोक अर्जुन अलका

PRINCIPAL
Swaraj College of Commerce
and Computer Studies
Dhankawadi, Pune-43

SWARAJ COLLEGE OF COMMERCE & COMPUTER STUDIES PUNE-43

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य २०२०-२१/डीबीटी/ 6602 दि. १.०६.२०२१

तात्काळ ईमेलद्वारा

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय :- सन २०२०-२१ करीता महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरणे तसेच संबंधित अर्जांची महाविद्यालय व विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत.**

राज्यशासनाच्या विविध विभागांच्या शिष्यवृत्ती योजनांची एकत्रितपणे अंमलबजावणी करणेसाठी विकसीत केलेल्या महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. सदरहू **शिष्यवृत्ती योजनांसाठी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता पात्र असुनही अद्याप अर्ज केलेले नसतील अशा विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी पोर्टलवरुन अर्ज करण्यासाठी दि. ३०.०६.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.** सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरीता विद्यार्थ्यांना अर्ज भरणेसाठी ही शेवटची संधी देण्यात आलेली आहे. यापुढे मुदतवाढ देण्यात येणार नसून, पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी मुदतीमध्ये अर्ज भरणेसाठी त्यांचे महाविद्यालय / संस्था/ विद्यापीठ यांचेमार्फत कळविण्यात यावे.

विद्यार्थ्यांनी भरलेले शिष्यवृत्ती अर्ज संस्था तसेच विभाग स्तरावरुन दररोज निकाली काढणे आवश्यक आहे, कोणत्याही परिस्थितीत संस्था तसेच विभाग स्तरावर अर्ज प्रलंबित ठेऊ नयेत. प्रलंबित राहिलेल्या अर्जांबाबत भविष्यामध्ये उद्भवणाऱ्या बाबीस संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण / विद्यापीठाबाबत कुलसचिव / महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील.

विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची उपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. इन्स्टियुट लॉगीन वरुन उपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन शिष्यवृत्ती अर्ज पुढील टप्प्यावर पाठविल्याशिवाय, संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण होत नाही.

तसेच सद्यस्थितीत उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे लाभ वितरण सुरु झालेले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन त्यांचे अर्जांची स्थिती तपासावी. डीडीओ द्वारे लाभ वितरीत केल्यास रीडीम बटण सक्रिय होते. शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांना महाडीबीटी व पीएफएमएस प्रणालीद्वारे आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यात येतात. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांचे बँक खातेशी आधार संलग्न नाही अशा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती लाभ मिळणेसाठी त्वरीत बँक खातेशी आधार संलग्न करावे.

विद्यापीठ / संस्था / महाविद्यालय यांच्यामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव, महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील. याबाबत सर्व संबंधितांना तात्काळ सूचना देण्यात याव्यात.

(डॉ. अजिता शिंदे)
कनिष्ट प्रशासन अधिकारी,
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

11/6/21

PUNE-43